अतिक्रमण/अनधिकृत बांधकाम निर्मुलन विभाग
पुणे महानगरपालिका
जा.क्र.ई/ १३५
दिनांक : २९।४।२०२०.

मा. पोलीस आयुक्त
पुणे शहर.

यांजकडेस सादर....

विषय : **कोरोना विषाणू प्रतिबंधात्मक उपायाबाबत.**
पुणे महानगरपालिका हद्दीमधील नागरी भागात आपत्कालीन (लॉकडाऊन) कालावधीमध्ये रस्ता, पदपथांवर अनधिकृतपणे भाजीपाला, फळे विक्री करणाऱ्या व्यवसायिकांवर प्रखरपणे कारवाई करणेबाबत.

संदर्भ : १) पुणे महानगरपालिकेमार्फत दि.२६/०३/२०२० रोजी आपत्कालीन कालावधीत भाजीपाला, फळे विक्री करणाऱ्या अधिकृत व्यवसायिकांची जाहीर प्रकटनाद्वारे घोषित करण्यात आलेली यादी.
२) आपत्ती व्यवस्थापन विभागाकडील जा.क्र.२१,दि.१०/०४/२०२० रोजीचे मा. महापालिका आयुक्त यांचे आदेश.

पुणे शहरात कोरोना विषाणू (कोव्हीड - १९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजने अंतर्गत सद्यस्थितीत शहरात जमावबंदी आदेश कलम १४४ लागू झालेली आहे. त्या अनुषंगाने केंद्र / राज्य शासनाकडून घोषित करण्यात आलेल्या आपत्कालीन (लॉकडाऊन) कालावधीमध्ये रस्ता, पदपथांवर ५ पेक्षा जास्त व्यक्ती एकत्र असणे धोकादायक आहे. या कारणास्तव पुणे महानगरपालिकेकडून रस्ता, पदपथांवरील अधिकृत व्यवसायिकांकडून कोरोना प्रतिबंधात्मक उपाययोजनेची काटेकोरपणे अंमलबजावणी होत नसल्यामुळे त्यांना व्यवसायास प्रतिबंध करण्यात आलेला असून, अधिकृत / अनधिकृत व्यवसायिकांवर १५ क्षेत्रिय कार्यालय स्तरावर दैनंदिन कारवाया करण्यात येत आहे. तसेच संदर्भ क्र.१ अन्वये पुणे शहरात घरपोहच / घराजवळील ठिकाणी शहरातील नागरिकांना अत्यावश्यक सेवेअंतर्गत आवश्यक भाजीपाला, फळे उपलब्ध करून देणेकरिता जाहीर प्रकटनाद्वारे अंदाजे १२३ कृषी पणन महामंडळाकडील नोंदणीकृत शेतकरी समूह गटांची यादी प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. सदरची यादी मनपा वेबसाईटवर नागरिकांच्या माहितीसाठी टाकण्यात आलेली असून, त्यांचेमार्फत शहरात योग्य पद्धतीने भाजीपाला, फळे घरपोहच / घराजवळील ठिकाणी नागरिकांना उपलब्ध करून देण्याची कार्यवाही योग्य पद्धतीने चालू आहे.

Scanned by CamScanner

तथापि शहरामध्ये रात्री-अपरात्री काही व्यवसायिक / शेतकरी अनधिकृतपणे टेम्पो, ट्रक सारख्या वाहनांमधून भाजीपाला, फळे आणत असून ते स्वतः अथवा इतर व्यवसायिकांमार्फत शहरातील रस्ता, पदपथांवर अनधिकृतपणे भाजीपाला, फळे यांची विक्री करीत असताना नव्याने आढळून येत आहे. अशा व्यवसायिकांकडून कोणत्याही प्रकारचे कोरोना प्रतिबंधात्मक उपाय अवलंबविले जात नसल्याने या व्यवसायिकांकडून अथवा त्यांचेकडे येणाऱ्या नागरिकांकडून कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता आहे. अशा व्यवसायिकाबाबत स्थानिक नागरिकांकडून, मा. सभासदांकडून तक्रारी या कार्यालयाकडे प्राप्त झालेल्या आहेत.

अशा अनधिकृतपणे रात्री-अपरात्री भाजीपाला, फळे शहरात घेवून येणाऱ्या वाहनांवर शहराचे हद्दीवरील पोलीस चेक नाक्यांवर अडविण्याची कार्यवाही करण्यात यावी. तसेच रस्ता, पदपथांवर अनधिकृतपणे भाजीपाला, फळे विक्री करणाऱ्या वाहनांवर तसेच पथारी लावणाऱ्या व्यवसायिकांवर कठोरपणे निर्बंध घालणेबाबत, आवश्यकतेनुसार गुन्हे दाखल करणेबाबत स्थानिक पोलीस विभाग व वाहतूक पोलीस विभाग यांना आदेश देणेविषयी विनंती आहे.

मा. स. कळावे.

(माधव जगताप)
उप आयुक्त
(अतिक्रमण/अनधिकृत बांधकाम निर्मुलन विभाग)
पुणे महानगरपालिका.

सोबत-: संदर्भांकित यादी / आदेश

**प्रत :-**

मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त (विशेष)
पुणे महानगरपालिका.

यांजकडेस माहितीसाठी सविनय सादर....



Scanned by CamScanner

आपत्ती व्यवस्थापन विभाग
पुणे महानगरपालिका
जावक क्र : २१
दिनांक : १०/०४/२०२०

## आदेश

विषय :- कोरोना विषाणुमुळे उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाच्या प्रतिबंध व नियंत्रण याबाबत आदेश.

संदर्भ – १) अधिसूचना सार्वजनिक आरोग्य विभाग,गोकुळदास रूग्णालय संकुल,मंत्रालय मुंबई ४००००१ दि.१४ मार्च २०२० क्र.करोना २०२०/प्र.क्र५८/आरोग्य ५.
२) आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५
३) भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम १८९७
४) जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,जिल्हाधिकारी कार्यालय पुणे,क्र.जि.आ.व्य./१२४/२०२० पुणे.दिनांक.१५/०३/२०२० यांचे आदेश.

ज्याअर्थी,राज्यात कोरोना विषाणुमुळे(COVID) उद्भवलेल्या संसर्गजन्य आजारामुळे पुणे शहरात आरोग्य विषयक आपत्कालीन परिस्थिती निर्माण झालेली आहे.

ज्याअर्थी,जागतिक आरोग्य संघटना तसेच आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय,भारत सरकार यांनी या संसर्गजन्य रोगाच्या नियंत्रणास्तव प्रस्तावित केलेल्या विविध उपाय योजनांची प्रभावी अंमलबजावणी व राज्यात कोरोना विषाणुच्या प्रादुर्भावामुळे उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाच्या नियंत्रणास्तव पुणे महानगरपालिका क्षेत्रात आपत्कालीन उपाययोजना लागु करण्याची व त्यावर प्रतिबंधात्मक उपाययोजना आखण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे.पुणे शहरातील कोरोना व्हायरस पॉझिटिव्ह रुग्णाची संख्या दिवसेंदिवस अधिक वेगाने वाढत आहे. भारतातील कोरोना पॉझिटिव्ह रुग्णांची संख्या विचारात घेता,येत्या काळात पुणे शहरात रुग्णांची संख्या आणखी वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही.त्यामुळे पुणेकरांच्या सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने शहरातील काही भागांमध्ये पुढील काही दिवस नागरिकांच्या हालचालींवर,बाहेर फिरणाऱ्यावर मर्यादा आणणे आवश्यक झाले आहे.

ज्याअर्थी,अधिसूचना सार्वजनिक आरोग्य विभाग,गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल,नवीन मंत्रालय,मुंबई ४००००१ दि.१४ मार्च २०२० क्र.करोना २०२०/ प्र.क्र.५८/आरोग्य ५ नुसार एखाद्या भौगोलिक क्षेत्रात उदाहरणार्थ गाव,तालुका,वाडी,कॉलनी इत्यादी मध्ये कोव्हीड १९ चा प्रादुर्भाव/उद्रेक आढळल्यास अशा उद्रेकजन्य क्षेत्राबाबत खाली नमूद केलेल्या तसेच प्रसंगानुसार आवश्यक असलेल्या

Scanned by CamScanner

प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी संबधित जिल्हाधिकारी/महानगरपालिका आयुक्त हे सक्षम प्राधिकारी असतील.अशा भौगोलिक क्षेत्राच्या बाबतीत क्र.१० मधील,

अ) क्षेत्र प्रतिबंधित करणे.

आ)क्षेत्रातील नागरिकांचे आगमन व प्रस्थान प्रतिबंधित करणे.

इ) क्षेत्रातून वाहनांचे आवागमन प्रतिबंधित करणे.

तसेच भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम १८९७ व आपत्ती व्यवस्थापन कायदा,२००५ प्रमाणे संभाव्य कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावामुळे मानवी आरोग्याला व जीविताला धोका निर्माण होण्याचा संभव आहे.याकरिता कोरोना विषाणुमुळे उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाचे प्रतिबंध व नियंत्रण याबाबतचे आदेश लागु करण्यात येत आहे.

पुणे शहरात कोरोना विषाणु प्रादुर्भाव रोखणेकरिता पुणे शहरातील भाजी मंड्या/बाजार/फेरीवाले यांना व्यवसाय करणेसाठी पुर्णपणे प्रतिबंध करण्यात आलेला होते.तदनंतर महाराष्ट्र शासनाने दिलेल्या आदेशानुसार शहरातील भाजी मंड्या/बाजार सुरु करण्यात आलेले आहेत.यांमुळे नागरिकांची सोय होऊन शेतकऱ्यांचा देखील माल शहरामध्ये विक्रीसाठी येत होता.शहरामध्ये भाजी मंड्या/बाजार येथे मोठ्या प्रमाणात सोशल डीसटन्स पाळले जात नाही.त्याचप्रमाणे ज्या भागामध्ये बाजार भरवले जातात त्या ठिकाणावर देखील नागरिकांच्या असंख्य तक्रारी प्राप्त होत आहेत.नागरिक भाजी आणण्यासाठी येताना रस्त्यावर इतरत्र फिरताना देखील आढळून येतात,यामुळे पोलीस प्रशासनामार्फत देखील कारवाई करणे अडचणीचे होते.तसेच रस्त्यांवर अनाधिकृत भाजी/फळे विक्रेते आपला व्यवसाय करीत असल्याने त्यांचेकडून खरेदीसाठी नागरिकांची मोठ्या प्रमाणात खरेदी करण्यासाठी गर्दी होत आहे.पुणे शहरामध्ये काही भागात पुर्णपणे सील करण्यात आलेले असुनही त्या भागांमध्ये भाजी/फळे विक्री सुरु असल्याने उद्देश सफल होताना दिसून येत नाही.

शहरामध्ये कोरोना विषाणूचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता त्या ठिकाणी होणारी गर्दी विचारात घेऊन खालीलप्रमाणे काही निर्णय घेणे आवश्यक आहे.असे वाटते.

१) शहरातील अनधिकृत फेरीवाले यांनी पूर्णपणे त्यांचेकडील भाजीपाला विक्री करण्यास बंदी आणण्यात आली आहे, जर असे कोणीही अनधिकृत विक्रेते भाजी विक्री करताना आढळुन आल्यास त्यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

२) शहरामध्ये सुरु असलेल्या भाजी मंड्या/बाजार सोशल डीसटन्स ठेऊन सकाळी ११.०० ते २.०० व ३.०० ते ५.०० पर्यंत सुरु ठेवणे.व त्याकरिता भाजी मंड्या/बाजार परिसरामध्ये फक्त पाच व्यक्तींना प्रवेश देणे.

अ).दोन भाजी विक्रेता मध्ये किमान १० फुटाचे अंतर ठेवणे

ब).एका भाजी विक्रेत्याकडे १एका वेळेस फक्त एका व्यक्तीने खरेदी करणे

क).इतर व्यक्तींना भाजी मंड्या बाहेर सहा फुटाचे अंतरावर उभे राहणे अशाप्रकारे सोशल डीसटन्स ठेऊन त्याची व्यवस्था करणे

-ज्या ठिकाणी याचे पालन होणार नाही त्या भाजी मंड्या/बाजार पूर्णपणे बंद करून संबधितांवर गुन्हा दाखल करणे.

३) पोलिसांनी वरील १ व २ बाबतचे व्यवस्थेची काटेकोर पालन होईल आणि कायदा व सुव्यवस्थेचा भंग होणार नाही हे सुनिश्चित करणे.

सदर कार्यवाही करिता जिल्हा दंडाधिकारी यांचेकडील उपरोक्त संदर्भ क्र.४ च्या आदेशान्वये सर्व महापालिका सहाय्यक आयुक्त,पुणे मनपा यांची त्यांच्या कार्यक्षेत्राकरिता सनियंत्रण अधिकारी म्हणुन नियुक्ती करण्यात आली असुन संबधित महापालिका सहा.आयुक्त यांनी उपरोक्त नमुद सील केलेल्या त्यांच्या कार्यक्षेत्रात रस्त्यावर अनाधिकृत फळे/भाजी विक्रेते आढळल्यास त्यांच्या विरुद्ध कायदेशीर कार्यवाही करावी.

हा आदेश आज दिनांक ०९ एप्रिल २०२० रोजी माझ्या सही शिक्याने दिला आहे.

(शेखर गायकवाड)
महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका.

प्रत –

१) मा.विभागीय आयुक्त,विभागीय आयुक्त कार्यालय पुणे

२) मा.पोलीस आयुक्त,पोलीस आयुक्त कार्यालय पुणे.

३) जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,जिल्हा पुणे.

यांचेकडे माहिती व पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित.

Scanned by CamScanner